# कुटुंब जीवन षिक्षण : काळाची गरज !

'कुटुंब जीवन षिक्षण' हा विषय काही नवीन नाही पण तो कषारीतीने किषोरवयीन मुलामुलींसमोर मांडायचा याबद्दलचा विचार नव्याने करणे आवष्यक आहे. माणसाच्या शारिरीक, मानसिक, भावनिक, सांस्कृतिक व सामाजिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून हे षिक्षण दिले गेले पाहिजे. माणसाच्या अनेक सहज प्रवृत्तींपैकी लैंगिक भावना ही एक शक्तीषाली प्रवृत्ती आहे जी शारिरीक वाढीबरोबरच वाढीला लागते. त्यामुळे शरीराची वाढ होताना होणाऱ्या मानसिक व भावनिक बदलांषी सुसंवाद साधला तरच कुमारवयीन व्यक्तिमत्व सुदृढ बनेल. शालेय विद्यार्थ्यांना लैंगिक षिक्षण द्यावे की नाही हा आता फारसा वादाचा मुद्दा उरला नाही पण हे षिक्षण कोणी द्यावे आणि कुठल्या वयात कसे द्यावे याबद्दल मात्र अजूनही निष्चित निर्णय झालेला नाही.

पन्नास वर्षापूर्वीची सामाजिक घडण जषी आज बदलली तषा काळानुरूप गरजा पण बदलल्या आहेत. देषांतर्गत संबंधच नव्हे तर बाह्यदेषांषीही जवळचे संबंध आल्याने संस्कृतींची सरमिसळ झाली. त्यामुळे काही जीवनमूल्ये, सामाजिक मूल्ये बदलली आहेत. तरी काही मूल्ये त्रिकालाबाधित असतात. तेव्हा न बदलणारी मूल्ये, नवीन सामाजिक मूल्ये व व्यक्तीचा जीवनप्रवाह यांचा सुसंवाद असायला हवा, जेणेकरून त्या काळातील त्या समाजात रहावयास आपण योग्य ठरू.

दूरदर्षन, जाहिराती, मासिके, चित्रपट यासारख्या माध्यमातून कुमारवयीन मुलांच्या मनात उत्सुकता, संभ्रम, भय, नैराष्य यांसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे त्यांच्या शंकांकडे, प्रष्नांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून हेटाळणी करण्यापेक्षा त्यांच्याषी मोकळेपणाने चर्चा करावी. अषी चर्चा करताना कधी कधी पालकांना एकदम गांगरायला होतं म्हणून नैसर्गिक संधी साधून आपल्या कुमारवयीन पाल्यांषी वैज्ञानिक दृष्टीकोनातून संवाद साधावा म्हणजे अडचण वाटणार नाही. घरीच जर शंका समाधान झाले तर मुलांना आई–वडिलही जवळचे, मैत्रीचे वाटतील.

आजच्या धकाधकीच्या जीवनात घराच्या सौख्यासाठी सतत धडपडणाऱ्या नवरा–बायकोंनी आपल्या वयात येणाऱ्या मुलामुलींषी मैत्रीच्या नात्याने संवाद साधणे अत्यंत जरूरीचे आहे. केवळ बंधने घालण्यापेक्षा आणि परलिंगी मैत्रीवर आक्षेप घेण्यापेक्षा त्यामागची आपली कळकळ आणि संभाव्य धोके दोन्हीही गोष्टी मुलांच्या मनापर्यंत पोहचविणे महत्वाचे आहे. मुलामुलींची निकोप मैत्री नक्कीच होऊ शकते. फक्त त्या निखळ मैत्रीत कुठे थांबायचे याची जाणीव दोघांनाही असायला हवी. यासाठी पालकांनीही मोठ्या मनाने मुलामुलींच्या मैत्रीतला थोडाफार मोकळेपणा मान्य करायला हरकत नाही म्हणजे मुलंही पालकांना विष्वासात घेऊन वागतील. याबाबतीत 'सातच्या आत घरात' या चित्रपटातील 'आजीची' भूमिका रास्त वाटते जी काळानुरूप बदलणाऱ्या समाजात राहूनही जीवनमूल्ये जपण्याची गरज आपल्या मॉडर्न नातीला पटवून देते.

'कुटुंब जीवन षिक्षण' किंवा 'लैंगिक षिक्षण' दिल्यामुळें मुलांची वैषयिक उत्सुकता वाढेल आणि ते नको ते प्रयोग करतील असे काहींना वाटते. पण प्रचंड गतीने पाष्चिमात्य संस्कृतीकडे वाटचाल करणाऱ्या भारतात, कुमारवयीनांना याविषयीचे आवष्यक ते ज्ञान वैज्ञानिक दृष्टिकोनातून दिले जाणे नक्कीच योग्य आहे. यामुळे मुले आणि मुली अत्यंत मोकळेपणाने विचार करू लागतील आणि पुढील आयुष्यातील संभाव्य धोक्यांपासून स्वतःचे रक्षण करू शकतील.

अषारीतीने ही नवतरूणपिढी अधिक डोळस आणि स्वतंत्र वृत्तीची होईल. तसेच शहाणपणाने भावी निर्णय कसे घ्यावेत आणि भावी वैवाहिक जीवनाच्या जबाबदाऱ्या कषा पार पाडाव्यात यासाठी ही पिढी आपोआपच तयार होऊ लागेल.

डॉ. सौ. प्राजक्ता कडूसकर